“उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे विद्याशाखेत पीएच.डी (अर्थशास्त्र) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक

वाघमारे मनोज दामोधर

एम.ए.,बी.एड्,नेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मुंडकर एस.एम.

एम.ए.एम.फील, पीएच.डी

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे, महाविद्यालय, जळकोट

जि.लातूर.

एप्रिल—२०१९

“उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास”

१) प्रस्तावाना :—

भारतात अनेक जाती—जमाती अस्तित्वात आहेत. भारतातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय व आर्थिक जीवन जाती व्यवस्थेनुसार ठरते. म्हणजे जाती व्यवस्था हा भारतीय समाज व्यवस्थेचा अविभाज्य अंग आहे. तसेच महत्वाची सामाजिक संस्था आहे.

प्रचलित जाती व्यवस्थेचे मुळ वर्णव्यवस्थेत आहे. भारतीय पुराण शास्त्रानुसार जाती व्यवस्थेचा उगम ब्रम्हाच्या निरनिराळया अवयवापासून झाला आहे. म्हणजे ब्रम्हाच्या मुखातून ब्राम्हणाचा, हातातून क्षत्रियांचा, मांडीतून वैश्याचा व पायातून शुद्रांचा जन्म झाला आहे असे म्हणतात.

जातीची व्याख्या :—

जातीची व्याख्या खालीलप्रमाणे केलेल्या आहेत.

१) कुले :— “जेंव्हा एखादा वर्ग पुर्णपणे अनुवंशिकतेनुसार ठरतो तेंव्हा त्या वर्गास जात म्हणतात”

२) कर्वे :— “विस्तृत संबंध असणारा आंतर विवाहित समुह म्हणजे जात होय”

३) नेसफिल्ड :— “भारतातील जाती प्रामुख्याने लोक करीत असलेल्या व्यवसायापासून पडल्या असून समाजात व्यक्तीचा दर्जा समाजात करीत असलेल्या व्यवसायावरून ठरतो.”

जातीची वैशिष्टये :—

१) जाती अंतर्गत विवाह जातीच्या उत्पत्तीचे कारण आहे.

२) धर्मानेच जातीच्या भिंती निर्माण केल्या आहेत.

३) जातीमध्ये एका लोकसमुहाचा इतर जातीमधील लोक समुहाबरोबर खाण्या पिण्याचा संबंध नसतो.

अनुसूचित जातीचा अर्थ व व्याख्या:—

भारतात अगदी प्राचीन काळातील धर्म पंरपरेनुसार भारतीय समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र हे चार वर्ण होते. हया चार वर्णाशिवाय आणखी पाचवा वर्ण अस्तित्वात होता त्याला अस्पृश्य म्हणतात. म्हणजेच प्राचीन काळापासून अस्पृश्यतेची प्रथा रूढ आहे. भारतीय समाजात प्रचलित असलेल्या जाती व्यवस्थेतूनच अस्पृश्यतेचा उगम झाला आहे. महात्मा गांधीनी या अस्पृश्यांना हरिजन म्हटले आहे. शासकिय भाषेत शुद्र किंवा अस्पृश्य वर्ग हा अनुसूचित जाती म्हणून ओळखला जातो म्हणजे पुर्वीच्या अस्पृश्य जाती या अनुसूचित जाती होय.

अनुसूचित जातीची व्याख्या :—

१) **जी.एस.धुर्ये :—** "अनुसूचित जाती म्हणजे असे समुह की ज्यांचा समावेश घटनेच्या अनुसूचित जातीच्या यादीत केला आहे."

२) **जी.ए.मुजूमदार:—** "अस्पृश्य जाती म्हणजे अशा जाती की ज्यांना सामाजिक व राजकियदृष्टया अयोग्य मानले जाते व ज्यांच्यावर उच्च वर्गाने परंपरेद्वारे अनेक निर्बंध लादले आहेत"

३)डॉ.कैलाशनाथ शर्मा:— "अस्पृश्य जाती म्हणजे अशा जाती की ज्यांच्या स्पर्शाने व्यक्ती अपवित्र होते असे मानले जाते आणि त्या व्यक्तीस पवित्र होण्यास काही प्रायश्चित विधी करावे लागतात."

अनुसूचित जातीची वैशिष्टये :—

१) ज्यांना परंपरेनुसार समाजात हीन दर्जा मिळाला आहे.

२) या जाती इतर सामान्य जाती प्रमाणे धार्मिक कृत्ये करू शकत नाहीत. उदा.यज्ञ, होम, वेदमंत्राचा उच्चार.

३) यांच्यावर विशिष्ट सामाजिक धार्मिक व राजकिय र्निबंध लादले आहेत.

अनुसूचित जातीमध्ये महार (बौध्द), मातंग, चांभार, ढोर, होलार, खाटिक, मेडगी, मेहतर, डोंब, बेडर, शेणवी इत्यादीचा समावेश होतो. यापैकी महार, मातंग, चांभार, ढोर, होलार यांची लोकसंख्या जास्त आहे. महाराष्ट्र २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या ११.८१% आहे. तसेच उस्मानाबाद जिल्हयाची एकूण लोकसंख्या १६५७५७१ असून यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या २६५१८४ एवढी आहे.

२) संशोधन विषयाची गरज (आवश्यकता) :—

प्राचीन काळापासून अस्पृश्य म्हणून गणल्या जाणा—या अनुसूचित जातीची परिस्थिती अत्यंत बिकट, हालाखीची व दयनीय आहे. उस्मानाबाद जिल्हा हा आर्थिकदृष्टया मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयाची एकूण लोकसंख्या १६५७५७१ एवढी असून या एकूण लोकसंख्येपैकी १५.९९% लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे. अनुसूचित जातीच्या विकासासाठी भारतीय राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद करून तसेच

शासकीय योजनांची अंमलबजावणी करून ही आतापर्यंत त्यांचा विकास पाहिजे तितका झाला नाही. तसेच या अनुसूचित जातीतील कांही कुटूंबे दारिद्रेरेषेखाली जीवन जगत असल्याने त्यांचे रहाणीमान कमी दर्जाचे आहे. निरक्षरता व अज्ञानामुळे यांच्यावर अंधश्रध्देचा प्रभाव जास्त आहे. तसेच अल्प मालमत्ता, बेरोजगारी, कमी सामाजिक प्रतिष्ठा, समाजाची बंधणे, सामाजिक व आर्थिक शोषण या सर्व गोष्टीमुळे त्यांचा विकास पुर्ण झालेला नाही म्हणून उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिती कशी आहे याचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते म्हणून संशोधनासाठी “उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास” हा विषय निवडला आहे.

३) संशोधनाची उदिष्टये :—

प्रस्तुत विषयांच्या संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी खालील उदिष्टये निश्चित केली आहे.

१) अनुसूचित जातीतील Sub Cast (पोट जाती) ची ऐतिहासिक पार्श्र्वभूमीचा अभ्यास करणे.

२) उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

३) उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीच्या शैक्षणिक व सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकणे.

४) उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीना मिळणाऱ्या शासकिय योजनांचा अभ्यास करणे.

५) उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचे राहणीमान व गरीबीचे प्रमाण शोधणे.

४) संशोधनाची गृहीतके :—

१) अनुसूचित जातीत साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे.

२) अनुसूचित जातीचे सामाजिक स्थान फार चांगले नाही.

३) अनुसूचित जातीतील कुटूंबांना शासकिय योजनांचा लाभ अतिशय कमी प्रमाणात मिळतो.

४) अनुसूचित जातीत बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे.

५) अनुसूचित जातीतील कुटूंबाचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे.

५) संशोधन पध्दती :—

उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

i) माहिती साधने :—

संशोधनासाठी माहिती ही प्राथमिक व दुय्यम सामुग्रीद्वारे मिळवली जाणार आहे. प्राथमिक सामुग्रीही प्रश्नावलीद्वारे मिळवली जाणार आहे व दुय्यम सामुग्री ही केंद्र व राज्य सरकारच्या अभ्यास पत्रिका, अहवाल मासिके, विविध योजनांची पुस्तके, उस्मानाबाद जिल्हा नियोजन मंडळाचे अहवाल, पुस्तके, लोकराज्य, इंटरनेट विकीपेडीया, उस्मानाबाद जिल्हा

सामाजिक व आर्थिक समालोचन, संदर्भ पुस्तके यांच्या द्वारे मिळवली जाणार आहे.

ii) संशोधनाची व्याप्ती :—

संशोधनाचे क्षेत्र हे उस्मानाबाद जिल्हा आहे. उस्मानाबाद जिल्हयात अनुसूचित जातीत समाविष्ट असलेल्या महार (बौध्द), मातंग, चांभार, ढोर व होलार या जातीचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास केला जाणार आहे.

iii) नमुना निवडा :—

संशोधनासाठी नमुना निवड पध्दती खालील प्रमाणे वापरली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी उस्मानाबाद जिल्हा निवडला आहे. उस्मानाबाद जिल्हयात एकूण आठ (८) तालुके आहेत. या प्रत्येक तालुक्यातील १० गावे, संभाव्य नमुना निवड पध्दतीनुसार साधा यादृच्छिक नमुना निवड (दैवन्यादर्श नमुना निवड) पध्दतीतील लॉटरी, पध्दतीने निवडणार आहे. अशा प्रकारे या गावांची संख्या ८० होते. या प्रत्येक गावातून ५ अनुसूचित जातीच्या कुटूंबाचे नमुने या प्रमाणे आठ (८) तालुक्यातील ४०० अनुसूचित जातीच्या कुटूंबाचे नमुने घेतले जाणार आहेत.

iv) सांख्यिकीय साधने :—

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी योग्य ठिकाणी तक्ते, आलेख, आकृत्या स्तंभालेख इत्यादी माध्यमाचा वापर केला जाणार आहे. या सोबत सरासरी, गुणोत्तर विश्लेषण, प्रमाण विचलन, सांख्यिकीय मध्य, मध्यका बहुलक, सहसंबंध गुणक या सांख्यिकीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

प्रस्तुत संशोधनातील गृहितकांच्या पडताळणीसाठी आणि विश्लेषणासाठी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. जसे t चाचणी, X^2 चाचणी व विचलन गुणांक यांच्या वापरातून आलेले निष्कर्ष मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाणार आहे.

६) अपेक्षित प्रकरणाची यादी :—

सदर संशोधनाची विभागणी एकूण सात (७) प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण १ ले	:—	प्रस्तावना
प्रकरण २ रे	:—	संदर्भ साहित्याचा आढावा.
प्रकरण ३ रे	:—	उस्मानाबाद जिल्हा ओळख.
प्रकरण ४ थे	:—	उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचा आर्थिक अभ्यास.
प्रकरण ५ वे	:—	उस्मानाबाद जिल्हयातील अनुसूचित जातीचा शैक्षणिक व सामाजिक अभ्यास.
प्रकरण ६ वे	:—	शासनांच्या विविध योजनांचा अनुसूचित जातीच्या राहणीमानावर होणारा परिणाम.
प्रकरण ७ वे	:—	निष्कर्ष व शिफारशी.
परिशिष्टये	:—	अ) उस्मानाबाद नकाशा ब) अनुसूची

संदर्भ सूची

लेखक		शीर्षक
१) महात्मा जोतिबा फुले	—	गुलामगिरी
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर	—	शुद्रपुर्वी कोण होते
३) विठ्ठल रामजी शिंदे	—	भारतातील अस्पृश्यांचा प्रश्न
४) कांबळे एन.डी	—	अनुसूचित जाती
५) प्रा.डॉ.लुलेकर पी.जी.	—	बलुतेदार
६) प्रा.पी.के.पिसाळ	—	समाजशास्त्र
७) शामचरण दुबे	—	भारतीय समाज
८) चव्हाण रामनाथ	—	जाती व जमाती
९) दिलिप अर्जुने	—	मातंग समाजाची स्थिती व गती
१०) ए.बी.सवदी	—	द मेगा स्टेट महाराष्ट्र
११) रामचरण शर्मा	—	प्राचीन भारताचा परिचय

संशोधक
वाघमारे मनोज दामोधर
एम.ए.,बी.एड, नेट

मार्गदर्शक
प्रा.डॉ.मुंडकर एस.एम.
एम.ए.एम.फिल, पीएच.डी.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
संभाजीराव केंद्रे, महाविद्यालय, जळकोट
जि.लातूर.